**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५४/२०१८ मधील नि.३५ वरील आदेश</u>**

**<u>(प्रकाश वि. ग्रामसेवक बुर्ली वगैरे)</u>**

**<u>(CNR:MHSN120004312023)</u>**

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. **वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादीने असे कथन केले आहे की, दावामिळकतीच्या पश्चिमेस कॉन्क्रीटचा रस्ता असून त्यास लागून पश्चिम बाजुस गटार आहे किंवा कसे, गटारीमुळे वादीच्या घराचे नुकसान झाले किंवा कसे या सर्व बाबी दाव्याचा निकाल लावण्याकरिता आवश्यक आहे व कोर्ट कमिशनरची नेमणुक केल्यास दावा मिळकतीची वस्तुस्थिती पटलावर येण्यास मदत होईल. करिता वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करुन कोर्ट कमिशनरची नेमणुक करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांना संधी असताना देखील त्यांनी त्यांचे म्हणणे सादर न केल्याने प्रस्तुतचा अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

४. प्रस्तुतचा अर्ज वाचला. वादी यांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदीचा, दावा मिळकतीची स्थिती पुर्ववत करण्यकरिता अनिवार्य हुकूमाकरिता दाखल केला आहे. वादीने असे कथन केले आहे की, दावामिळकतीच्या समोर असणा–या कॉन्क्रीट रस्त्याच्या समोरील पश्चिम बाजुस असणा–या घरांची सांडपाणी दावामिळकतीमध्ये एल आकाराच्या गटारीत सोडण्याच्या तयारीत आहे व त्यामुळे वादमिळकतीचे नुकसान होत आहे, जरी वादीने प्रतिवादी यांनी गटाराचे बांधकाम केले

व गटारीच्या पाण्यामुळे दावामिळकतीचे नुकसान होत आहे असे कथन केले व प्रतिवादीविरोधात निरंतर व अनिवार्य हुकूम पारीत करण्याची विनंती केली आहे. वादीस गटारीमुळे दावामिळकतीचे नुकसान होत आहे किंवा कसे या बाबी पुराव्यानिशी पटलावर शाबीत करणे आवश्यक आहे आणि वादीचा दावा व मागणीचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणात कोर्ट कमिशनरची नेमणुक करणे आवश्यक वाटत नाही. वादी हा सदरचा अर्ज सादर करुन पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करीत आहे व सदरची बाब कायदेशिर ठरत नाही त्यामुळे एकंदरित परिस्थितीचा विचार करता सदरचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत आहे.

## आदेश

वादीचा निशाणी क्र.३५ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

**sd/-**

**पलूस** **(एम. ए. एम. जे. शेख)**

**दिनांक– १३.१०.२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पलूस**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 13.10.2025 |
| Order signed by the Presiding officer on | : | 13.10.2025 |
| Order uploaded on | : | 17.10.2025 |